नि.दि.दा.क्र.२१३/२०१०
मुरलीधर वि. अंकुश

**निशाणी क्र. २४१ वरील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी वादी क्र. १ ब यांचे वारस दाव्याचे कामी अभिलेखावर घेवून त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करणेची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. सदर वादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत दाव्यातील वादी क्र. १ ब संजय मुरलीधर जगताप हे दि. ०८.०३.२०२६ रोजी मयत झाले असून त्यांना वादी क्र. १ ब १) ते १ ब ३) असे वारस असून वादी क्र. १ ब यांचे नाव कमी करून वारसांना १ ब १) ते १ ब ३) म्हणुन दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. असे कथन करून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी अर्जावरच त्यांचे म्हणणे देवून योग्य ते न्यायाचे आदेश व्हावेत असे कथन केले आहे.

३. वादी व प्रतिवादी तर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचे अर्ज व म्हणण्याप्रमाणे युक्तिवाद केला. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत दाव्यातील वादी क्र. १ ब  संजय मुरलीधर जगताप हे दि. ०८.०३.२०२६ रोजी मयत झाले असून त्यांना वादी क्र. १ ब १) ते १ ब ३) असे वारस असून वादी क्र. १ ब यांचे नाव कमी करून वारसांना १ ब १) ते १ ब ३) म्हणुन दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. वादीने त्यांच्या कथनांच्या पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दिले आहे. वादी क्र. १ ब यांचे वारसांना दाव्यामध्ये समाविष्ट करून त्याप्रमाणे मुळ दाव्यामध्ये दुरूस्ती करणेची परवानगी देणे दाव्याच्या पुढील कार्यवाहीसाठी आवश्यक आहे. अर्जास योग्य कारण आहे. सबब, न्यायाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे—

**आदेशः—**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी वादी क्र. १ ब संजय मुरलीधर जगताप यांचे वारसांना मुळ दाव्यामध्ये वादी म्हणून सामील करून घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादीने वारस रेकॉर्डवर घेण्यापूरती दाव्यात दुरूस्ती पुढील तारखेपर्यंत करावी.

RAVINDRA ANANDRAO SAWANT
Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT
Date: 2026.06.18 15:56:35 +0530

( रविंद्र. आ. सावंत )

दि. १८.०६.२०२६ — दुसरे सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर), सासवड.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file orders are same word for word as per original Judgment/order."

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | P. R. Shirke (Stenographer Grade III) |
| Court Name | : | Shri. R. A. Sawant<br>C.J.J.D.& J.M.F.C.,Saswad. |
| Date | : | 18/06/2026 |
| Order signed by presiding officer on | : | 18/06/2026 |
| Order Uploaded on | : | 18/06/2026 |